## महत्त्वाचे

### रेडिओ फॉर चाइल्ड पुरस्कार फलके यांना

औरंगाबाद : युनिसेफतर्फे दिला जाणारा रेडिओ फॉर चाइल्ड पुरस्कार यंदा आकाशवाणी औरंगाबादच्या कार्यक्रम अधिकारी नम्रता फलके यांना मिळाला आहे. युनिसेफची सदिच्छा दूत अभिनेत्री माधुरी दीक्षित यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. सप्टेंबरमध्ये बालकांच्या लसीकरण आणि अत्याचारांवर प्रकाश टाकणारे प्रोमो, स्पॉट, जिंगल बनविण्याची स्पर्धा झाली. यात नम्रता फलके यांना स्पॉट वर्गात डार्कनेट पुरस्कार मिळाला. प्रासंगिक कलाकार रफिक मोहंमद, कनिज फातिमा, नीलेश चव्हाण यांनी प्रोमोसाठी आवाज दिला. सिद्धार्थ मेश्राम यांनी मार्गदर्शन केले.

### मोकाट जनावरांचा सुळसुळाट

वाळूज महानगर : बजाजनगरात मोकाट जनावरांचा सुळसुळाट वाढल्यामुळे नागरिक व वाहनधारकांची डोकेदुखी वाढली आहे. या परिसरात मोरे चौक, मोहाटादेवी चौक, लोकमान्य चौक, महाराणा प्रताप चौक आदी ठिकाणी तसेच मुख्य रस्त्यावर मोकाट जनावरांचे कळप असतो.

### मुकुल मंदिरमध्ये मार्गदर्शन

औरंगाबाद : मुकुल मंदिर शाळेत मुलींसाठी स्वसंरक्षणविषयक मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक पूनम पाटील व कॉन्स्टेबल सोनाली भदाणे, दीपाली पवार यांनी मार्गदर्शन केले. ज्योत्स्ना जाधव यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. रंजना भावे यांनी संचालन केले. संपदा सुरडकर यांनी आभार मानले.

### एलोरा हायस्कूलचे यश

औरंगाबाद : एलोरा इंग्रजी हायस्कूलच्या ११ विद्यार्थ्यांनी डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत यश मिळविले. यातील ६ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले. यात भूमिका चव्हाण, सर्वेश गुरखे, पार्थ चव्हाण, चिन्मय चोपडे, रिया मरसाळे, निरंजन खैरनार, अनुष्का आमले, अमृता बिडाईत, ऐश्वर्या गायकवाड, हर्ष कटारे, प्रतीक तायडे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यांना निलाक्षी राव, प्रतीक्षा वैद्य, अर्चना मांडे, स्वाती देशमुख, सुकेशिनी निपाणीकर यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार मुख्याध्यापिका संगीता भापकर यांनी केला.

**चुकांवर उपाय शोधावा :** परवाने देण्याचे अधिकार काढण्याच्या हालचाली

# जि.प.चे कार्य दुबळे आहे का?

विजय सरवदे | लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** जिल्हा परिषदांकडून बियाणे, खते व कीटकनाशके विक्रीचे परवाने देण्याचा अधिकार काढून घेण्याच्या कृषी आयुक्तांच्या हालचालींवर औरंगाबाद जिल्हा परिषदेमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. केवळ परवाने देण्याचे अधिकार बदलण्यामुळे चुका होणे थांबणार आहे का. चुकांवर उपाय शोधण्याचे सोडून अधिकार काढण्याचा निर्णय चुकीचा आहे. ज्यांना कोणाला अधिकार देणार असतील, तिकडेही माणसेच काम करणार आहेत व येथेही माणसेच काम करीत आहेत. अधिकार कमी करून कृषी आयुक्तालय काय साध्य करणार आहे, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.

यवतमाळसह राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पिकांवर कीटकनाशकांची फवारणी करताना विषबाधा होऊन जवळपास ३६ शेतकऱ्यांना जीव गमवावा लागला. या घटनांमुळे कीटकनाशकांच्या गुणवत्ता नियंत्रणाचा विषय ऐरणीवर आला. कृषी आयुक्तांनी जिल्हा परिषदेच्या कृषी अधिकाऱ्यांवर राजकारण्यांच्या दबावाखाली काम करीत असल्याचा आरोप करत यापुढे बियाणे, खते व कीटकनाशकांचे परवाने देण्याचे अधिकार त्यांच्याकडून काढून घेण्यासंबंधीचा प्रस्ताव कृषी सचिवांकडे सादर केला आहे. या पार्श्वभूमीवर परवाने देण्याचे अधिकार काढून घेतल्यास कामकाजात काय बदल होईल, याबाबत जिल्हा परिषद कृषी विभाग आणि पदाधिकाऱ्यांमध्ये चाचपणी केली. तेव्हा जिल्हा परिषदेच्या कामकाजावर शंका घेणे योग्य नाही. आजपर्यंत जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फतच हे परवाने दिले जात होते. औरंगाबाद जिल्ह्यात बियाणे, खते आणि कीटकनाशकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य सरकारचे १३ आणि जिल्हा परिषदेचे ११ कृषी निरीक्षक कार्यरत आहेत. शासन परवाने देण्याचा अधिकार काढून घेणार असेल, तर मग जिल्ह्यातील कार्यरत कृषी निरीक्षकही काढून घेणार आहेत का, असा प्रश्नही यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.

परवाने देण्याचे अधिकार काढून घेण्याने कृषी विभागाचे काहीही नुकसान होणार नाही किंवा फायदाही होणार नाही. परवान्यासाठी लागणारे विहित शुल्क हे जिल्हा परिषदेच्या तिजोरीत नव्हे तर शासनाच्याच तिजोरीत जाते. दुसरीकडे, गुणवत्ता नियंत्रणासाठी शासनाचे व जिल्हा परिषदेच्या निरीक्षकांनी सतर्क राहून अनियमितता आढळून आलेल्या विक्रेत्यांचे अनेक परवाने रद्दही केले आहेत.

अधिकार बदलण्याने सुधारणा होत नसते, मानसिकता बदलण्याने परिणाम दिसून येत असतो, असे मत कृषी विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी व्यक्त केले आहे. कृषी परवाने व गुणवत्ता नियंत्रणासाठी जिल्हास्तरावर वर्ग-१ दर्जाचा अधिकारी उपसंचालक म्हणून देण्याच्या शासनस्तरावर हालचाली सुरू आहेत.

### जिल्हा परिषदेने केले यंदा ७५ परवाने रद्द



- यासंदर्भात जि. प. कृषी विभागाने अनियमितता आढळून आलेल्या विक्रेत्यांविरुद्ध काय कारवाई केली, याचा आढावा घेतला असता जिल्हाभरातील २२०० परवानाधारक कीटनाशक विक्रेत्यांपैकी ६७ जणांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. बियाणांच्या २३०० विक्रेत्यांपैकी ५ आणि खतांच्या २५ विक्रेत्यांपैकी ३ जणांचे परवाने, असे एकूण यंदा ७५ परवाने रद्द करण्याची कारवाई जि. प. कृषी विभागाने केली आहे.
- यामध्ये मान्यता नसणाऱ्या कंपन्यांचे खते व बियाणांची विक्री करताना आढळून आलेल्या प्रत्येकी एक, अशा दोन विक्रेत्यांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. परवाने घेतले आहेत; पण नंतर दुकानेच सुरू न करणाऱ्या विक्रेत्यांची तपासणी सध्या जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत सुरू आहे. असे अनेक परवानेधारक तपासणी मोहिमेत सापडतील. याबाबतचा १५ दिवसांत अहवाल प्राप्त होईल. दुकाने न सुरू करणाऱ्या परवानेधारकांचे परवाने रद्द करण्याची कारवाई केली जाणार आहे.






# रस्त्याची दयनीय अवस्था

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाळूज महानगर :** वाळूज परिसरातील लांझी ते धामोरी या रस्त्याची दयनीय अवस्था झाल्यामुळे दळण-वळण यंत्रणा ठप्प पडत आहे. या रस्त्यावर मोठाले खड्डे पडले असून, रस्ता दुरुस्तीसाठी सतत पाठपुरावा करूनही याकडे लक्ष दिले जात नसल्यामुळे शेतकरी व नागरिकांत असंतोषाचे वातावरण पसरले आहे.

गत पाच-सहा वर्षांपूर्वी नाबार्डमधून मोठा निधी खर्च करून या रस्त्याचे काम उरकण्यात आले होते; मात्र रस्त्याच्या गुणवत्तेकडे लक्ष न दिल्यामुळे या रस्त्याची वर्षभरातच वाट लागली होती. विशेष म्हणजे धामोरीपासून पिंपरखेडापर्यंतच रस्त्याचे काम करण्यात आले असून, पिंपरखेडा ते लांझीपर्यंत रस्त्याचे काम अर्धवट सोडल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. रस्त्यावरील खडी निखळल्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

वाळूज औद्योगिक परिसरात दररोज कामासाठी ये-जा करणाऱ्यांना त्रास होत असून, वेळेच्या आत कामावर पोहोचता येत नसल्यामुळे अनेकदा कामाला दांडी मारावी लागते.

साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरू झाला असून, अनेक शेतकऱ्यांचा ऊस गाळपासाठी नेला जात आहे; मात्र रस्त्याच्या दयनीय अवस्थेमुळे उसाने भरलेली वाहने घेऊन जाताना चालकांना कसरत करावी लागत आहे.

# खड्डेमय रस्त्यांचे अक्षांश, रेखांशसह पॅचवर्क

**बांधकाम विभाग :** संपूर्ण माहितीसह तयार होणार अहवाल; पारदर्शक कामाचा दावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद : मराठवाड्यातील** खड्डे पडलेल्या रस्त्यांचे अक्षांश आणि रेखांशसह पॅचवर्क करण्यात येत असून, त्याचा पूर्ण अहवाल तयार करून बांधकाम खात्याकडे सादर करण्यात येणार आहे. नगरनाका ते महावीर चौकापर्यंतच्या रस्त्याचे सील कोटिंग व पॅचवर्क रविवारी करण्यात आले. त्या कामाचे व्हिडिओ शूटिंग करून छायाचित्र काढण्यात आले. त्यावर रस्त्याचे अक्षांश, रेखांश, रस्त्याचा राज्य महामार्ग असा क्रमांक, तारीख व कामाची वेळ नोंदविण्यात आली आहे. ते काम सुरू असताना विभागातील कोणत्या अधिकाऱ्याने त्याची पाहणी केली, याचाही त्यामध्ये उल्लेख आहे. मराठवाड्यात हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे अधीक्षक अभियंता अतुल चव्हाण यांनी सांगितले. बहुतांश कामे कागदोपत्री होतात, त्याचे रेकॉर्डही विश्वसनीय नसते. त्यामुळे विभागासह औरंगाबाद आणि जालन्यातील पॅचवर्कची कामे या पद्धतीने करून त्यामध्ये पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न बांधकाम विभाग करीत आहे. कागदोपत्री कामाला कुठलाही वाव या डाटा कलेक्शनमुळे राहणार नसल्याचा दावा चव्हाण यांनी लोकमतशी बोलताना केला.

मराठवाड्यात ५ हजार कि. मी. रस्ते खड्ड्यात

मराठवाडा प्रादेशिक विभागाच्या हद्दीतील १८ हजारपैकी सुमारे ५ हजार कि. मी. रस्त्यांची यंदाच्या पावसाळ्यात चाळणी झाली आहे. त्या रस्त्यांची डागडुजी १५ डिसेंबर २०१७ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट आहे. जिल्हा परिषदेचे रस्ते वगळून १८ हजार कि.मी. रस्ते सा. बां. विभागाकडे आहेत. त्यातील ५ हजार कि.मी.पर्यंत रस्ते यंदाच्या पावसाळ्यात उखडले आहेत. डीएलपी (डिफेक्ट लायबिलीटी पिरियड) अंतर्गत जे रस्ते आहेत, त्यावर पडलेले खड्डे कंत्राटदारांकडून दुरुस्त करण्यात येणार आहेत. परंतु ज्या रस्त्यांची डीएलपी संपलेली आहे, त्या रस्त्यांसाठी नव्याने शॉर्ट टेंडर काढले आहे.

### दोन जिल्ह्यांत ३ हजार कि.मी. रस्ते खड्ड्यात

- औरंगाबाद आणि जालना जिल्ह्यांतील ६४ कोटी खड्डे बुजविण्यासाठी लागणार आहेत. औरंगाबादेत ११४ कामांतील १९९४ कि. मी. रस्त्यांना ४३ कोटी तर जालन्यातील ५७ कामांतील ६८७ कि.मी रस्त्यांना साडेएकवीस कोटी रुपये लागणार आहेत. दोन्ही मिळून १७१ कामे असून, ३ हजार ८१ कि. मी. रस्त्यांचा त्यात समावेश असून, अनेक ठिकाणी कामे सुरू केल्याचा दावा विभागाने केला.



अधीक्षक अभियंता अतुल चव्हाण यांच्या उपस्थितीत अक्षांश व रेखांशनुसार पॅचवर्क.

### खड्डे बुजवा; आज निदर्शने

- राज्य व प्रमुख जिल्हा मार्गातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याच्या मागणीसाठी शिवसेनेतर्फे उद्या सोमवारी सकाळी ११ वा. कोकणवाडी ते बांधकाम भवनपर्यंत निदर्शने करण्यात येणार असल्याचे जिल्हाप्रमुख अंबादास दानवे यांनी कळविले आहे.

## धुळीत रस्ता शोधणे अवघड



जळगाव रोडवर एसबीओए शाळेच्या पुढे दिवसभर अशी धूळ उडत असते. या धुळीतून वाहनधारकांना सायंकाळी रस्ता शोधणे बरेच अवघड होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने अलीकडेच या रस्त्याचे काम केले होते. रस्त्यावर उडणारी धूळ थांबवावी अशी नागरिकांची मागणी आहे.



सॅफ्रॉन लॅण्डमार्क प्रस्तुत महामॅरेथॉनसाठी आपण सज्ज असल्याचा पुरावा औरंगाबादकरांनी रविवारी दिला. लोकमत लॉन येथे आयोजित फिटनेस पार्टीला असा उदंड प्रतिसाद मिळाला.

**जबरदस्त उत्साह :** १७ डिसेंबरची तयारी आतापासूनच सुरू; धावपटूंसाठी अनोखी पर्वणी

# महामॅरेथॉनच्या फिटनेस पार्टीत औरंगाबादकरांचा दणक्यात 'रॉकऑन'

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** किटी पार्टी, बर्थडे पार्टी आपण अनेकदा ऐकल्या आहेत. मात्र, अवघ्या महाराष्ट्रात पहिल्यांदाच झालेल्या 'फिटनेस पार्टी'ला औरंगाबादकरांनी दणक्यात प्रतिसाद दिला आणि 'वुई आर रेडी.....' असे म्हणत १७ डिसेंबर रोजी शहरात होणाऱ्या सॅफ्रॉन लॅण्डमार्क प्रस्तुत औरंगाबाद महामॅरेथॉनसाठी आपण जबरदस्त तयारीत असल्याचे दाखवून दिले.

महामॅरेथॉनसाठी नावनोंदणी केलेल्या सर्व धावपटूंसाठी रविवारी सायंकाळी लोकमत लॉन येथे या पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. महामॅरेथॉनचा महासोहळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असल्यामुळे आता धावपटूंनी फिटनेसबाबत अधिकाधिक जागरूक होणे आवश्यक झाले आहे. यासाठी सर्व धावपटूंनी एकत्र येऊन फिटनेससाठी 'वार्म अप' करावे आणि हेल्दी ड्रिंक आणि फूडचा आनंद घ्यावा, यासाठी रंगलेली ही पार्टी धावपटूंसाठी पर्वणीच ठरली.

आकर्षक प्रकाशयोजना, थिरकण्यास भाग पाडेल असे 'रॉकऑन म्युझिक' आणि हॉलिवूड तसेच बॉलिवूडच्या तालावर थिरकत आबालवृद्धांनी केलेला उत्स्फूर्त जल्लोष, असे उत्साहवर्धक वातावरण या पार्टीदरम्यान दिसून आले. सॅफ्रॉन लॅण्डमार्कचे अनिल मुनोत, ललित झांबड यांनी याठिकाणी येऊन उपस्थितांचा उत्साह वाढविला.

महामॅरेथॉनसाठी शहरवासीयांमध्ये उसळलेल्या प्रचंड उत्साहाची प्रचीती या फिटनेस पार्टीत आली. व्यायामाचे जुने प्रकार मागे सोडून उपस्थितांनी रिलॅक्स झीलच्या एक्सपर्ट ट्रेनरनी शिकविलेले नवीन व्यायाम प्रकार आत्मसात केले आणि संगीताच्या तालावर स्वत:ला झोकून देत एकच जल्लोष केला. झुंबा, भांगडा, पिलोझिंग, मसाला बॉलिवूड यासारखे नवनवीन व्यायाम प्रकार आत्मसात करून उपस्थितांनी फिटनेस पार्टीचा 'झिंगाट' आनंद लुटला. आपल्या मित्रमंडळींसोबत आणि कुटुंबासोबत एकत्रितपणे व्यायाम करणे सर्वांसाठीच वेगळा अनुभव देणारे ठरले. यादरम्यान ज्येष्ठ नागरिकांनीही तरुणांच्या तालात ताल मिसळून झुंबाच्या तालावर ठेका धरून बहारदार नृत्य केले. व्यायाम करून नवचैतन्य मिळविल्यानंतर 'हेल्दी' पदार्थांचा आस्वाद घेऊन पार्टीचा समारोप झाला.



Brought to you by SAFFRON LANDMARKS | Aurangabad Maha Marathon | A LOKMAT INITIATIVE | 21km | 17 Dec 2017 | Associate Sponsor riso | Powered by DHOOT TRANSMISSION | #MahaMarathon /MahaMarathon

### महामॅरेथॉनची आकर्षणे

महामॅरेथॉनच्या महासोहळ्यापर्यंत अनेक आकर्षक कार्यक्रम रंगणार आहेत. 'फिटनेस पार्टी'ने या आकर्षणांची जणू सुरुवातच झाली. यादरम्यान अनेकांनी महामॅरेथॉनसाठी नावनोंदणी करून पार्टीचा आनंद लुटला. तुम्हीही महामॅरेथॉनसाठी लवकरात लवकर नावनोंदणी करा आणि या प्रवासादरम्यान असणाऱ्या आगामी आकर्षक सोहळ्यांचे साक्षीदार बना. फिटनेस पार्टीची रंगत पाहून उपस्थित रनर्समध्ये यावर्षीच्या महामॅरेथॉनमध्ये अनेक रंगतदार आकर्षने असणार याची चर्चा होती.



# हातपंप दुरुस्तीसाठी खरेदी केली नवीन चार वाहने

**जिल्हा परिषद :** चार पंचायत समित्यांना नव्हती वाहने

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने देखभाल दुरुस्ती निधीमधून हातपंप दुरुस्तीसाठी चार वाहनांची खरेदी केली. या वाहनांचे लोकार्पण जि.प. अध्यक्षा देवयानी पाटील डोणगावकर यांच्या हस्ते शनिवारी झाले. ही चारही वाहने फुलंब्री, गंगापूर, कन्नड, खुलताबाद या पंचायत समितींना देण्यात येणार आहेत.

जिल्ह्यामध्ये सर्व नऊ पंचायत समित्यांमध्ये प्रत्येकी एक, अशी नऊ हातपंप दुरुस्ती पथके कार्यरत आहेत; परंतु तालुक्याचा वाढलेला विस्तार व हातपंपांची संख्या लक्षात घेता या पथकाला ग्रामीण भागात हातपंप दुरुस्तीकरिता पोहोचण्यासाठी चार पंचायत समित्यांकडे वाहनेच नव्हती. यापूर्वीची वाहने ही सुमारे २० ते २५ वर्षांची जुनी झालेली होती.



जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने देखभाल दुरुस्ती निधीमधून हातपंप दुरुस्तीच्या चार वाहनांचे लोकार्पण केले त्याप्रसंगी जि.प. अध्यक्षा देवयानी पाटील डोणगावकर, अधिकारी व पदाधिकारी.

या चारही पंचायत समित्यांमधील जुन्या वाहनांचे आयुष्यमान संपलेले होते. त्यामुळे ती निर्लेखित करण्यात आली. आगामी काळात संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता हातपंप दुरुस्ती पथकांना दक्ष ठेवण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकरराजे आर्दड यांनी देखभाल दुरुस्तीच्या निधीतून ही चार वाहने खरेदी करण्यास मान्यता दिली होती. त्यानुसार काल खरेदी करण्यात आलेल्या वाहनांचे जिल्हा परिषदेत अध्यक्षा डोणगावकर यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

सदरील वाहने ही पाणीपुरवठा विभागांतर्गत यांत्रिकी विभागाच्या आधिपत्याखाली कार्य करतील. ही वाहने उपलब्ध झाल्यामुळे हातपंप दुरुस्ती पथकातील कर्मचाऱ्यांना सेवा देणे सुलभ झाले, अशी भूमिका उपअभियंता बी.डी. पाटील यांनी व्यक्त केली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिरसे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी जे.बी. चव्हाण, उपाध्यक्ष केशव तायडे, सभापती विलास भुमरे, धनराज बेडवाल, पाणीपुरवठा विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता ए.एस. घुगे आदी उपस्थित होते.

# पशुसंवर्धनच्या योजना खोळंबल्या

**प्रस्ताव प्राप्त :** १ कोटी ४४ हजार रुपयांचा निधी; लाभार्थी चिंतेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाने वैयक्तिक लाभाच्या विविध योजनांसाठी प्रस्ताव मागवून तीन महिन्यांचा कालावधी झाला. योजनांसाठी शासनाकडून तब्बल १ कोटी ४४ हजार रुपयांचा निधीही प्राप्त झाला. योजनांचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थ्यांनी मोठ्या अपेक्षेने कागदपत्रांची जुळवाजुळव करून प्रस्ताव सादर केले. परंतु अद्यापही लाभार्थींची यादीच अंतिम झालेली नसल्यामुळे योजना कधी मार्गी लागतील, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना जोडधंद्यासाठी मदत व्हावी म्हणून पशुसंवर्धन विभागामार्फत वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्या जातात. विशेष घटक योजनेंतर्गत ३ हजार ८९ नागरिकांकडून तीन महिन्यांपूर्वी प्रस्ताव मागवून घेतले आहेत. यापैकी गायींचे वाटप करण्यासाठी ३१ लाभार्थींची निवड करण्यात येणार आहे. यासाठी ७७९ अर्ज या विभागाकडे प्राप्त झाले आहेत.

शेळी गटासाठी १६८ लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार असून, यासाठी १ हजार ४१० अर्ज प्राप्त झाले आहेत. एकात्मिक कुक्कुटपालन विकास कार्यक्रमासाठी २५ लाभार्थींची निवड केली जाणार असून, यासाठी ८१ अर्ज दाखल झाले आहेत. 'मैत्रीण' योजनेंतर्गत मुलींसाठी शेळी वाटप करण्याच्या योजनेसाठी ७६ लाभार्थी निवडले जाणार असून, यासाठी ३९८ अर्ज प्राप्त झाले आहेत. कडबा कटर वाटप करण्यासाठी ४१ लाभार्थी निवडले जाणार आहेत. यासाठी ४२१ अर्ज या विभागाकडे प्राप्त झाले आहेत. दरम्यान, या विभागाने अद्यापही अंतिम निवड यादी तयार केलेली नाही. त्यामुळे अर्ज केलेले नागरिक चिंतेत आहेत.

पशुखाद्य आणि प्रशिक्षणासाठी प्रत्येकी १३३ व २०० लाभार्थी निवडायचे आहेत. मात्र, या योजनेला फारसा प्रतिसाद नाही. दरम्यान, वैरण विकास योजनेंतर्गत प्रोटिनयुक्त व दुग्धोत्पादन वाढीसाठी पूरक असणाऱ्या यशवंत व जयवंत गवताचे ठोंब वाटप करण्यात येतात, यासाठी अद्याप अर्ज मागविण्यात आलेले नसल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.



### विविध योजनांसाठी असा आहे निधी

| | |
|---|---|
| शेळी वाटप | ९० लाख |
| गाय वाटप | २५ लाख |
| मैत्रीण योजना | १५ लाख |
| खाद्यपुरवठा | ५ लाख |
| कडबा कटर | ५ लाख |
| प्रशिक्षण | २ लाख |
| एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम | २ लाख |


वाहन चालवीत असताना मोबाइलचा वापर करू नका.

Govt Reg.No.7342
पेन केअर इंस्टीट्युट
ऑर्थोपेडीक सर्जन द्वारे सल्ला व उपचार

सांधेवात, गुडघेदुखी, मान, पाठ,कंबरदुखी मायग्रेन (डोकेदुखी), फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी) सायटीका, स्लिप डिस्क, टाचदुखी, टेनिस ऐल्बो हातापायात मुंग्या येणे
अपना बाजार, बाफना ज्वेलर्स समोर, जालना रोड, औरंगाबाद.
9822899660, 9422713387, 9767442040
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे) सोमवार ते शुक्रवार फक्त

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैगिंक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. अॅझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक | १९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र

३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521